.. Nrisinha Arati ..

# ॥ नृसिंह आरती ॥

कडकडिला स्तंभ गडगडिलें गगन ।
अवनी होत आहे कंपायमान ॥
तडतडलीं नक्षत्रें पडताती जाण ।
उग्ररूपें प्रगटे तो सिंहवदन ॥ १॥

जय देव जय देव जय नरहरिराया ।
आरती ओंवाळूं महाराजवर्या ॥ धृ ॥

एकवीस स्वर्गमळा डळमळली कैसी ।
ब्रह्मयाच्या वाटे अभिनव चित्तासी ॥
चंद्रसूर्य दोन्ही लोपती प्रकाशी ।
कैलासी शंकर दचके मानसी ॥ जय॥ २॥

थरथरती त्या जटा जिव्हा लळलळित ।
तीक्ष्ण नखें तो दैत्य विदारीत ॥
अर्धांगीं कमलजा शिरीं छाया धरित ।
माधवदास स्वामी नरहरि शोभत ॥ जय ॥ ३॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 16, 1999